मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | सोमवार, दि. 10 फेब्रुवारी 2025 | पान- 1

# कुदळवाडीतील अनधिकृत पत्राशेड, गोदामे, भंगार दुकाने, बांधकामे 'भुईसपाट'

## पहिल्या दिवशी 222, दुसऱ्या दिवशी 607 बांधकामे निष्कासित करण्यात आली : महापालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या अतिक्रमण कारवाई राबविली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर सलग दुसऱ्या दिवशी निष्कासनाची कारवाई करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये आज ६८ लाख ७८ हजार चौरस फूट बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. त्यामध्ये सुमारे ६०७ बांधकामांचा समावेश होता.



महापालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या राबविलेल्या या कारवाईमध्ये पहिल्या दिवशी २२२ आणि आज दुसऱ्या दिवशी ६०७ बांधकामे निष्कासित करण्यात आली. पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कारवाईमध्ये अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, कार्यकारी अभियंता सुनिल बागवानी यांच्यासह उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी देखील सहभागी झाले होते.

> महापालिकेच्या आरक्षित जागेवर तसेच डिपी रस्त्यांवर असलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच अनधिकृत बांधकामांवर ब्लॉकनिहाय अतिक्रमण निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही ही कारवाई सुरू राहणार आहे. यामध्ये ज्यांचे साहित्य किंवा मशिनरी असतील त्यांनी त्या तात्काळ काढून घेऊन महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**



# शहरातील आरओ प्लांट, आरओ एटीएम प्लांट्सवर महापालिकेची कारवाई

## 10 आरओ प्लांट आणि 7 आरओ पाण्याच्या एटीएम प्लांट्सवर कारवाई : संबंधित चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

गिलियन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्सची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आढळून आलेल्या अशा १० आरओ प्लांटवर आज महापालिकेने कारवाई केली असून संबंधित चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आयुक्त शेखर यांनी दिली.

गिलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करुन पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई केली जात आहे.




### प्रभागनिहाय कारवाई..

» पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर यांच्यामार्फत क्षेत्रीय कार्यालयनिहाय या प्लांट्सची तपासणी केली जात आहे. यामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय २ आरओ प्लांट तर ७ एटीएम आरओ प्लांट, ब क्षेत्रीय कार्यालय १, ग क्षेत्रीय कार्यालय ४ आणि ह क्षेत्रीय कार्यालय १ आरओ प्लांटचा समावेश आहे.

> आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. गिलियन बेरे सिंड्रोमच्या (GBS) पार्श्वभूमीवर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे. पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतला जाईल,
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग**

# अनेक आमदार विधिमंडळात एकदाही कायद्यांवर बोलत नाहीत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आमदारांसाठी दोनदिवसीय- क्षमता वृद्धी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

कायदे तयार करणे हे विधानसभेचे प्राथमिक काम आहे. तसेच दुसरे महत्त्वाचे काम आर्थिक नियोजन आहे. विधिमंडळाची ही दोन महत्त्वाची कामे आहेत. मात्र, अनेक आमदारांना या सगळ्याबाबत कमी आवड असते. काही ठराविक आमदारच विधेयकांवर, कायद्यांवर आपले मत मांडतात. कायद्यांवर बोलणे सोपे काम असते. पण अनेक आमदार त्यांच्या कार्यकाळात एकदाही विधिमंडळात कायद्यांवर बोलत नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राष्ट्रीय विधायक संमेलन भारतातर्फे देशभरातील आमदारांसाठी दोनदिवसीय- क्षमता वृद्धी कार्यक्रम एमआयटी डब्ल्यूपीयू, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या संमेलनात देशभरातून आलेल्या विविध राजकीय पक्षांच्या 200 पेक्षा अधिक आमदारांनी सहभाग घेतला आहे.



### जनतेचा सुखांक वाढविण्यावर भर द्यावा

**» नितीन गडकरी म्हणाले, लोकशाही म्हणजे केवळ सत्ताकारण नाही, ते राजकारण, समाजकारण आणि विकासकारण आहे. राजकारणातून सामाजिक व आर्थिक सुधारणा होते. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी जनतेचा सुखांक (हॅपिनेस इंडेक्स) वाढविण्यावर भर द्यावा. मतदारसंघात संरचनात्मक, समाजोपयोगी आणि शाश्वत विकासाचे कार्यक्रम राबविले पाहिजेत. जनतेच्या समस्या सोडवल्या पाहिजेत.**

लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उत्तरप्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, झारखंड विधानसभेचे अध्यक्ष रवींद्रनाथ महातो, राजस्थान विधानसभेचे माजी अध्यक्ष डॉ. सी. पी. जोशी, एनएलसी भारतचे संस्थापक-संयोजक डॉ. राहुल कराड, प्रा. परिमल माया सुधाकर, कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस आदी उपस्थित होते. केंद्रीय रस्ते, वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी संमेलनात ऑनलाइन मार्गदर्शन केले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमदार हे भारताच्या संविधानानुसार काम करण्यासाठी निवडून आले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची रचना सुंदर केली आहे. मूठभर लोक कायदे बनवत असतात. हे लोक जे कायदा बनवतात ते त्या राज्याचा कायदा असतो. या राज्याच्या शेवटच्या नागरिकाची आकांक्षासुद्धा कायद्यात परावर्तीत झाली पाहिजे, यासाठी नागरिक लोकप्रतिनीधींना निवडून देतात.

मतदारसंघातील कामांमुळे नाही तर लग्न आणि इतर कार्यक्रमांना उपस्थिती लावल्याने निवडणूक जिंकून येत असल्याचे अनेक आमदार सांगतात. मात्र एकदा विधानसभेच्या कामकाजाचे शस्त्र वापरून पाहिल्यावर मूल्यावर्धन झाल्याचे लक्षात येते, तसेच प्रतिमासुद्धा तयार होते. विधानसभेचे कामकाज कोण गंभीरतेने घेतो हे प्रशासन पाहात असते. विधानसभेच्या आयुधाचा वापर करून आमचा पर्दाफाश करू शकतात, अशी भीती प्रशासनाला असते.

### डिजिटल माध्यमांवर अंकुश हवा

**» तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पहिल्यांदा निवडून आले. सोशल मीडिया, डिजिटल मीडियातून कधी चांगले तर कधी वाईट कथानक पसरवले जाते. एखादी माहिती वेगाने समाजात व्हायरल होते, अशा माध्यमांवर अंकुश असणे आवश्यक असून हे आव्हान पेलण्यासाठी सार्वजनिक व्यासपीठावर मंथन होणे गरजेचे असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.**

### लोकशाही संस्थांची प्रतिमा जपावी

**» राम शिंदे यांनी मतदारसंघातील लोकांच्या आकांक्षांची पूर्तता या विषयावर मार्गदर्शन केले. सतीश महाना म्हणाले, लोकप्रतिनिधींनी लोकशाही संस्थांची प्रतिमा जपण्याचे काम केले पाहिजे. डॉ. राहुल कराड म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर प्रथमच पक्ष-विचारधारेच्या पलीकडे जात सर्व विधानसभा, विधानपरिषदांचे आमदार या संमेलनाच्या व्यासपीठावर एकत्र येत आहेत. सनातन परंपरा हा सर्वांना जोडणारा दुवा असून आमदारांमध्ये संवाद निर्माण व्हावा.**

# महापालिकेकडून पार्किंग अखेर मेट्रोला देण्याचा निर्णय

## महापालिकेच्या भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीत त्यास मान्यता दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून तब्बल अडीच कोटी रुपयांचा खर्च करून जंगली महाराज रस्त्यावर छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या प्रवेशद्वाराच्या जवळ मेकॅनिकल वाहनतळ उभे करण्यात आले आहे. हे वाहनतळ मागील अनेक वर्षांपासून देखभाल दुरुस्तीअभावी पडून आहे. हे पार्किंग आता महामेट्रोच्या ताब्यात दिले जाणार आहे. महापालिकेच्या भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीत त्यास मान्यता दिली आहे.

पार्किंगमधून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ८० टक्के उत्पन्न महापालिकेस, तर २० टक्के उत्पन्न महामेट्रोस दिले जाणार आहे. त्यानुसार प्रकल्प विभागाकडून याबाबतचा सविस्तर प्रस्ताव महापालिका आयुक्तांना सादर केला जाणार आहे.

महापालिकेने हे वाहनतळ दहा ते बारा वर्षांपूर्वी उभारल्यानंतर एका ठेकेदारास चालविण्यास देण्यात आले होते. मात्र, ठेकेदाराकडून या ठिकाणी नागरिकांच्या वाहनांऐवजी खासगी वाहन विक्री करणाऱ्या एका बड्या राजकीय व्यक्तीच्या शोरूमच्या गाड्यांना दिल्याचे समोर आले होते. त्यानंतर महापालिकेने संबंधित ठेकेदाराकडून हे पार्किंग काढून घेण्यात आले.

त्यानंतर गेली सात ते आठ वर्षे ते बंद अवस्थेत असून, त्याची देखभाल दुरुस्ती न झाल्याने ते भंगारात जमा झाले आहे. त्यामुळे आता ते पुन्हा सुरू करायचे असल्यास नवीन गाड्यांच्या आकारानुसारही त्यात बदल करावे लागणार असून, मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागणार आहे. परिणामी, हा खर्च कोण करणार, हे अद्याप ठरलेले नाही. हे वाहनतळ मागील अनेक वर्षांपासून देखभाल दुरुस्तीअभावी पडून आहे. हे पार्किंग आता महामेट्रोच्या ताब्यात दिले जाणार आहे. महापालिकेच्या भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीत त्यास मान्यता दिली आहे. महापालिकेने हे वाहनतळ दहा ते बारा वर्षांपूर्वी उभारल्यानंतर एका ठेकेदारास चालविण्यास देण्यात आले होते. महापालिकेने संबंधित ठेकेदाराकडून हे पार्किंग काढून घेण्यात आले.

### दुरुस्तीचा भार कोणावर?

**» महामेट्रोस या वाहनतळासाठी निर्धारीत केलेले उत्पन्न पाहता केवळ २० टक्के उत्पन्न दिले जाणार असल्याने या पार्किंगची दुरुस्ती महापालिका करण्याची चिन्हे असून, त्यासाठी पुन्हा कोट्यवधीचा निधी खर्च केला जाणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.**

# वीज बिल न भरल्याने तिसरा डोळा बंद

## ठेकेदारांवर मेहेरबानी, स्मार्ट सिटीचा निष्काळजीपणा, वीज बिल भरण्याची महापालिकेची कायमस्वरूपी तयारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात नागरिकांच्या सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्थेसाठी स्मार्ट सिटी लिमिटेड यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. या कॅमेऱ्यासाठी मे.क्रिस्टल कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेतला होता. त्या वीजपुरवठा बिलाची मासिक रक्कम अदा करणे आवश्यक होते.

मात्र, वीज बिल अदा न केल्याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वीजपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही विद्युत कंपनीने सुरू केली होती. तसेच महापालिकेच्या अन्य विकास कामांना नवीन वीज जोडणी करण्यास नकार देण्यात येऊ लागला होता. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे थकीत वीज बिल महापालिकेकडून भरण्यात येणार आहे. दरम्यान, संबंधित मे. क्रिस्टल ठेकेदारांवर आणि स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांवर आयुक्तांकडून कोणती कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच, कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी स्मार्ट सिटी कंपनीने शहरात ५ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. या कॅमेऱ्यांसाठी वीज जोडणी घेण्यात आली आहे. त्याला स्वतंत्रपणे महावितरणचे मीटर लावण्यात आले आहेत. ती वीजजोडणी स्मार्ट सिटी कंपनीचे ठेकेदार क्रिस्टल तसेच, स्मार्ट सिटीने घेतले होते. या वीज पुरवठ्याचे बिल संबंधित ठेकेदार क्रिस्टलने भरणे आवश्यक होते.




### महावितरण कारवाईनंतर भरले वीज बिल

» स्मार्ट सिटीतील सर्वाधिक रेंगाळलेला प्रकल्प आहे. त्यात सातत्याने ठेकेदार, स्मार्ट सिटी कंपनीच्या वादातून कोणत्या कोणत्या अडचणी उद्भवतात. याच प्रकारातून या सेंटरचा वीजपुरवठा खंडित करण्याची वेळ आली. तसेच महावितरणने सीसीटीव्हीच्या नवीन जोडणीचे कामही थांबविले आहे. काम करणाऱ्या ठेकेदारी कंपनीने सप्टेंबर २०२४ चे वीज बिल स्मार्ट सिटी कंपनीने भरण्यास सांगितले. परंतु, ते स्मार्ट सिटी कंपनीने महापालिका विद्युत विभागाने वीज बिल भरण्यास कळविले होते. या गोंधळामुळे तीन महिने वीजबिल थकले. अखेर महावितरणने कारवाई केल्यानंतर महापालिकेच्या विद्युत विभागाने बिल अदा केले आहे.

### स्मार्ट सिटीचा कारभार चव्हाट्यावर

» शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत सीसीटीव्ही बसविले आहेत. त्याच्या नियंत्रणासाठी निगडीत कमांड अँण्ड कंट्रोल सेंटर तयार केले. मात्र, या सीसीटीव्हीच्या व कंट्रोल सेंटरच्या वीज बिलाची रक्कम न भरल्याने महावितरण कंपनीकडून वीजपुरवठा खंडित केला होता. हे सेंटर सुरू ठेवण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने तातडीने १२ लाखांचे वीजबिल भरले, मात्र, आता सीसीटीव्हीचे ३० लाख ५६ हजारांची थकबाकी आहे. त्यामुळे महावितरणने नवीन जोडणी थांबवली आहे. या प्रकारामुळे स्मार्ट सिटीचा कारभार चव्हाट्यावर आला आहे.

### क्रिस्टल कंपनीच्या बिलातून करणार वसूल

» थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेच्या विविध कामांना नवीन वीज मीटर देण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे महापालिकेने स्वत: थकीत वीजबिल भरावे, असा प्रस्ताव विद्युत विभागाने स्थायी समितीपुढे ठेवला होता. त्या प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे. थकीत बिल भरून ते ठेकेदार क्रिस्टल किंवा स्मार्ट सिटी कंपनीच्या बिलातून वसूल करण्यात येणार आहे. वीज बिल भरणे बंधनकारक असताना संबंधित ठेकेदारांनी ते भरले नाही. महावितरणने वीजपुरवठा खंडित केल्यानंतर शहरातील सर्व सीसीटीव्ही देखील बंद झाले होते. वीजपुरवठा खंडित केल्यानंतर महापालिकेची नाहक बदनामी झाली आहे. असे असताना मे. क्रिस्टल कंपनी ठेकेदारांसह स्मार्ट सिटी कंपनीच्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# पर्यावरण संवर्धनात 'मेट्रो'चा वाटा! दररोज दीड लाख प्रवासी, कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी

## पेट्रोल, डिझेल व सीएनजीवरील वाहने, कचरा जाळणे, कारखान्यांतील बॉयलर यांमुळे कार्बन डायऑक्साइडचे (सीओ2) प्रमाण वाढत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

तुम्ही मेट्रोने प्रवास करताय, अगदी योग्य निर्णय घेतलाय. पर्यावरण संवर्धनासाठी एक पाऊल पुढे टाकलंय. कारण, तुम्ही एकावेळी मेट्रोने प्रवास करून १.६५ ग्रॅम कार्बन डायऑक्साइडचे (सीओ-२) उत्सर्जन कमी करत आहात. मेट्रोकडील आकडेवारीनुसार दररोज सरासरी एक लाख ६० हजार नागरिक प्रवास करत आहेत. म्हणजेच दररोज २६४ किलोग्रॅम 'सीओ-२'चे उत्सर्जन वाचवून पुणे व पिंपरी-चिंचवडचे तापमान कमी ठेवण्यात मोलाचा वाटा उचलत आहेत.

पेट्रोल, डिझेल व सीएनजीवरील वाहने, कचरा जाळणे, कारखान्यांतील बॉयलर यांमुळे कार्बन डायऑक्साइडचे (सीओ२) प्रमाण वाढत आहे. परिणामी, पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे तापमानही वाढत आहे. शिवाय, दोन्ही शहरांत हवेची गुणवत्ताही ढासळली आहे.

त्यामध्ये सूक्ष्म, अतिसूक्ष्म धूलिकणांसह कार्बन डायऑक्साइड, सल्फर ऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइडचे प्रमाण वाढून प्रदूषणात वाढ झाली आहे, असे निरीक्षण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोंदविले आहे. त्याबाबत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांना उपाययोजना करायलाही सांगितल्या आहेत. त्यामध्ये मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी मोलाचा वाटा उचलला आहे.

कारण, 'मेट्रोमध्ये प्रवास करून तुम्ही सुमारे १.६५ ग्रॅम कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन वाचवत आहात,' असा 'मेट्रो'चा निष्कर्ष असून, त्याचा उल्लेख प्रवाशांच्या तिकिटांवर आहे. दिवसाला सरासरी एक लाख ६० हजार मेट्रो प्रवाशांमुळे सुमारे २६४ किलोग्रॅम कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन वाचवले जात आहे.



### 'सीओ2'चे मोजमाप

» दहा लाख लिटर हवेमध्ये एक लिटर 'सीओ२' असेल तर तो एक पीपीएम (पार्स पर मिलियन : 'सीओ२' मोजण्याचे परिमाण) आणि २२.२ लिटर अर्थात २२.२ पीपीएम म्हणजे ४४ ग्रॅम 'सीओ२'

» मेट्रोचा एक प्रवासी १.६५ ग्रॅम 'सीओ२' वाचवतो म्हणजे ८३२ मिलिलिटर अर्थात ०.८३२ पीपीएम 'सीओ२' वाचवतो, हेच प्रमाण दिवसाला एक लाख ६० प्रवाशांमागे २ लाख ६४ हजार ग्रॅम म्हणजेच २६४ किलोग्रॅम अर्थात १,३३,१२० पीपीएम 'सीओ२' वाचवतो

> पेट्रोल, डिझेल वा काहीही जाळले तरी 'सीओ२' वाढतो. त्यामुळे इंधन जाळण्याचे प्रमाण कमी व्हायला हवे. 'सीओ२'चे उत्सर्जन जितके कमी करणे म्हणजे पृथ्वी वाचविणे.
>
> **- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, रसायनशास्त्र अभ्यासक, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी**



# उरुळी कांचनसह परिसरातील वाहतूक कोंडी होणार दूर

## क्रॉसिंग व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय : उरुळी कांचन पोलीस ॲक्शन मोडवर

**पुणे | प्रतिनिधी**

उरुळी कांचन व परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी व वेगाने होणाऱ्या विकासाला चालना देण्यासाठी उरुळी कांचन पोलिसांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रस्तावित वाहतूक व्यवस्थेनुसार गावाच्या पूर्व-पश्चिम बाजूस तसेच मध्यवर्ती ठिकाणी क्रॉसिंग व्यवस्था निर्माण होणार असल्याने नागरिकांना अधिक सोयीस्कर आणि सुरक्षितपणे इच्छितस्थळी पोहोचण्यास मदत होईल. अशी माहिती उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी दिली आहे.



वाढत्या रहदारीमुळे उरुळी कांचन परिसरात, वाहनचालकांना, नागरिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून रहावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलीस वाहतूक विभाग, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, ग्रामपंचायत प्रशासन, व्यापार आघाडी, स्थानिक प्रशासन, व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याशी चर्चा करून संयुक्तरित्या 15 दिवसांच्या ट्रायल बेसिसवर या उपाययोजना आखल्या आहेत.

उरुळी कांचन ग्रामपंचायत हद्दीतील दोन्ही चौकात वारंवार होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी पुन्हा एकदा पुढाकार घेतला आहे. मागील एक ते दीड महिन्यांपूर्वी योग्य वाहतूक नियोजनामुळे तळवडी चौकात होणारी वाहतूक कोंडी दूर झाली होती. मात्र, उरुळी कांचन येथील व्यापारी असोशियनच्या बैठकीत व्यापाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे पाटील यांनी राबविलेला बॅरिकेट्स पॅटर्न थांबवला गेला. पाटील यांनी केलेल्या नियोजनाचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात आले होते.

उरुळी कांचन येथील तळवडी चौकातील वाहतूक कोंडी नित्याचीच आहे. आठवड्याच्या शनिवारी व दर रविवारी असलेला आठवडे बाजार यामुळे एलाईट चौक व तळवडी चौकात दोन ते तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागत आहेत. लग्नसमारंभ आणि सुट्ट्या यामुळे पुणे-सोलापूर महामार्गावर रविवारी दिवसभर वाहनांची गर्दी असते. शनिवारी दुपारनंतर पुण्याहून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढते. तसेच रविवारी सायंकाळी पाचनंतर सोलापूरवरून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या वाहनांची गर्दी वाढते. प्रस्तावित वाहतूक व्यवस्थेनुसार गावाच्या पूर्व-पश्चिम बाजूस तसेच मध्यवर्ती ठिकाणी क्रॉसिंग व्यवस्था निर्माण होणार असल्याने नागरिकांना अधिक सोयीस्कर आणि सुरक्षितपणे इच्छितस्थळी पोहोचण्यास मदत होईल.

> “उरुळी कांचन व परिसरातील नागरिकांच्या सोयीकरिता हे पंधरा दिवसांच्या ट्रायल बेसवर हे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील वाहतूककोंडीतून उरुळी कांचन व परिसरातील नागरिकांची सुटका करण्यासाठीचा आमचा प्रयत्न आहे. तरी नागरिकांनी सहकार्य करावे.”
> **- शंकर पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरुळी कांचन पोलीस ठाणे**

> “उरुळी कांचन सारख्या झपाट्याच्या वेगाने वाढणाऱ्या गावांमध्ये वाहतुकीसाठी क्रॉसिंग, एंट्रस किंवा एक्झिट साठी किमान दोन-तीन पर्याय व्यवस्था असणे आवश्यकच होते. प्रस्तावित वाहतूक नकाशा प्रमाणे गावाच्या पूर्व पश्चिम बाजूस आणि मध्यवर्ती ठिकाणी क्रॉसिंग व्यवस्था उपलब्ध करण्यात आल्यामुळे गावकऱ्यांना तात्पुरती (उड्डाणपूलच होणे गरजेचे आहे) परंतु एक संतुलित पर्यायी व्यवस्था मिळू शकेल असे वाटते.”
> **- विकास जगताप, उपाध्यक्ष, भाजपा व्यापार आघाडी महाराष्ट्र राज्य**

> “उरुळी कांचन पोलिसांनी बॅरिकेट्स पॅटर्न राबवल्याने व्यापाऱ्यावर आभाव झाला असे व्यापाऱ्यांचे मत बाहेर आले. पोलिसांनी नवीन मॅप आणला आहे. त्यानुसार वाहतूक सुरुळीत करताना प्रत्यक्ष अंमलबजावनी झाल्यावर समजणार आहे. पोलिसांनी केलेल्या या नवीन मॅपला चालना देण्यासाठी अंमलबजावणी करून सहकार्य करू”
> **- संतोष कांचन, माजी सरपंच, उरुळी कांचन.**

# अस्वच्छ हॉटेल,स्टॉलवर कारवाई करा; वसंतराव बाणखेले व ॲड. अमर कराळे यांची मागणी

## जीबीएस या दुर्मिळ आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी ठोस उपाययोजना तसेच जनजागृती करावी.

**पुणे | प्रतिनिधी**

जीबीएस हा आजार प्रामुख्याने खाद्यपदार्थाद्वारे होत असल्याने मंचर शहरातील हॉटेल, हातगाडीवर खाद्याचे स्टॉल अस्वच्छता असणाऱ्या व्यवसायकावर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष वसंतराव बाणखेले व ॲड. अमर कराळे यांनी केली.




जीबीएस या दुर्मिळ आजाराचा वाढता धोका लक्षात घेऊन जीबीएस (गुइलेन बॅरे सिंड्रोम) या दुर्मिळ आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मंचर नगरपंचायतीने ठोस उपाययोजना तसेच जनजागृती करावी.रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.ज्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत.

या आजाराचा प्रादुर्भाव पुणे शहरात मोठ्याप्रमाणात झाला असून आत्तापर्यंत एकट्या पुण्यातच अंदाजे १६५ च्या आसपास रुग्ण मृत्युमुखी पडले असून अनेक रुग्ण व्हेंटिलेटरवर असून काही रुग्णांवर उपचार चालू आहे. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुदैवाने आजपर्यंत कोणताच रुग्ण आढळला नसला तरी मंचर शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत उपाय योजना करणे गरजेचे असून जीबीएस या दुर्मिळ आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी.

जीबीएस या दुर्मिळ आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मंचर नगरपंचायतीने ठोस उपाययोजना तसेच जनजागृती करावी.रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.ज्यामुळे राज्यातील आरोग्य यंत्रणा अलर्ट झाल्या आहेत.

मंचर शहरातील हॉटेल, हातगाडीवर खाद्याचे स्टॉल अस्वच्छता असणाऱ्या व्यवसायकावर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष वसंतराव बाणखेले व ॲड. अमर कराळे यांनी केली.

त्याचप्रमाणे मंचर नगरपंचायतने जीबीएस आजारच्या उपचाराकरिता स्वतंत्र कक्षाची स्थापना करून मंचर उपजिल्हा रुग्णालयात न्यूरॉलॉजिस्टची नेमणूक करण्यात यावी. तसेच नगरपंचायतीच्या पाणीपुरवठ्याच्या टाक्या व नागरिकांनी साठवलेल्या पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करणे गरजेचे आहे. अशी मागणी पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष वसंतराव बाणखेले व ॲड. अमर कराळे यांनी केली.

> मंचर नगरपंचायतीच्या हद्दीत असणारे खाद्यपदार्थ विक्रेते यांनी ग्राहकांना चांगल्या पद्धतीने खाद्य दिले पाहिजे. अन्यथा ग्राहकांच्या तक्रारीनुसार कारवाई केली जाईल.
> **- गोविंद जाधव, मंचर नगरपंचायत, मुख्य अधिकारी.**